# मोनिका नं.१७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :-स.नं.२६९/१,प्लॉट नं.३२,३३,सि.टी.एस.नं.४२११, भोईर कॉलनी,चिंचवड,पुणे.४११ ०३३.

नोंदणी क्र.:-पीएनए/पीएनए/(३)/एचएसजी/(टिसी)/१२१५५/२०१२/दि.३०/०७/२०१२.

---

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

मोनिका नं.१७ संस्थेची पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०७.०१.२०२४ रोजी रात्री ०८.०० . वाजता संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती. संस्थेचे सभासद सदर सभेमध्ये २८ पैकी १८ सभासद उपस्थित होते. उपस्थित सभासदांचे स्वागत करून सदर सभेमधील खालील विषयांवर चर्चा सुरू करण्यासाठी संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांना पुढील विषय चालु करण्यासाठी संस्थेच्या वतीने अनुमती देण्यात आली.

### सभेपुढील विषय आणि ठराव

विषय क्र.:-१. संस्थेच्या पुर्नबांधणी प्रकल्पाबाबत प्राथमिक निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र.:-१. प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांनी आजच्या सभेसाठी पुर्नविकसनाबाबत सभासदांना मार्गदर्शन करण्यास प्रथम सभासदांना सहकार खात्याच्या ४ जुलै २०१९ च्या परिपत्रकाबाबत विस्तृत माहिती दिली. सदर प्रक्रिया चार टप्प्यात विभागली गेली आहे व प्रत्येक टप्प्याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी सभेपुढे केले. त्यावर सभासदांनी वेगवेगळया शंका विचारल्या एकूण सर्व चर्चा सकारात्मक पध्दतीने झाली तसेच सभासदांकडून मांडण्यात आलेल्या शंकांना योग्य पध्दतीने सकारात्मक दृष्टिकोनाने शंकासमाधान करण्यात आले व याचा विचार करताना सभासदांचा पुर्नबांधणी करण्यासाठी कौल असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सभेस उपस्थित असलेले सभासदांनी पुर्नबांधणी प्रस्तावास प्राथमिक मंजुरी असल्याचे सांगण्यात आले अशा रितीने पुर्नबांधणीप्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक:- श्री. उदय गोखले अनुमोदक:- सौ. वैशाली जगताप

ठराव सर्वसंमत

विषय क्र.:-२. सदर पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत पुर्नविकास समिती नेमणे व त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव क्र.:-२. संस्था इमारत पुर्नबांधणी प्रस्तवाच्या कार्यवाहीबाबत विवेचन श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे केले यानुसार सहकार खात्याने ४ जुलै २०१९ रोजी संस्था इमारत पुर्नविकास करणेसाठी विशेष परिपत्रक काढण्यात आले.त्यानुसार त्यातील आवश्यक बाबींची पुर्तता

करण्यासाठी, सदर बाबत आवश्यक माहिती गोळा करणे, वेगवेगळया एजन्सीची माहिती घेणे, त्यांच्याकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रक तसेच निविदा मागविणे, या सर्व गोष्टीवरील उल्लेख केलेल्या परिपत्रकातील आवश्यक बाबींची पुर्तता करणेकामी कार्यवाही करणेबाबत संस्थेची पुर्नविकास समिती व व्यवस्थापक समितीस अधिकार देण्याबाबत सदर ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर समिती पुढीलप्रमाणे :-

सुचकः- श्री.रामप्रसाद गुर्जर अनुमोदकः-श्री. दिलीप गायकर

ठराव सर्वसंमत

**विषय क्र.:-३.** सदर प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प सल्लागार व निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र.:-३.** सदर विषयाबाबत सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार आवश्यकतेनुसार वेगवेगळया एजन्सीज् नेमणे, प्रोफेशनल सल्ला घेणे, आवश्यक ती कागदपत्रे तयार करून घेणे, आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून घेणे आवश्यक आहे. त्याचे महत्व तसेच त्याबाबतच्या आर्थिक बाबी या सर्व गोष्टी मा.पदाधिकाऱ्यांकडून सभासदांपुढे मांडण्यात आल्या सभासदांकडून याबाबत वेगवेगळी माहिती विचारण्यात आली. तसेच काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु त्या सर्व शंकांचे योग्य पध्दतीने व आवश्यक माहिती पुरवून समाधान करण्यात आले. त्यानुसार प्रकल्प सल्लागार एजन्सी नेमणेबाबत सर्व सभासदांचे एकमत झाले. व त्यानुसार संस्थेकडे आलेल्या निविदेनुसार मेसर्स.डी.जी.असोसिएटस् (सोसायटी प्लस) कंपनी या संस्थेची निवड सदर सभेमध्ये एकमताने करण्यात आली.

सुचकः- सौ. वैशाली जगताप अनुमोदकः- श्री.उदय गोखले

ठराव सर्वसंमत

**विषय क्र.:-४.** संस्थेच्या इमारत पुर्नविकाससंबंधीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सादर करणे.

**ठराव क्र.:-४.** श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे इमारत पुर्नविकाससंबंधिच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांच्या 1.Feasibility Report 2. Tender Process Activation कार्यवाहीच्या स्वरूपाबाबत माहिती दिली व त्याबाबतच्या कार्यवाहीचे अधिकार रिडेव्हलपमेंट कमिटी व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात आले.

सदर दोन्ही प्रोसेसची कार्यवाही पुर्ण करून साधारण दोन ते तीन महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

सुचक:- श्रीमती. मॅथीव अनुमोदक:-श्री. संजय पवार

यानंतर संस्थेच्या वतीने उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे आणि प्रकल्प सल्लागार श्री. संजय सुर्यवंशी यांचे आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.

मोनिका नं.१७ सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने,

अध्यक्ष सचिव